संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल ते जुलै,२०१९ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संगांयो -२०१९/प्र.क्र.४५/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १४ मे, २०१९.

<u>वाचा</u> :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२/कोषा-प्रशा ५, दि.१२.०२.२०१९.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९.
४. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक बीयुडी २०१९/प्र.क्र.६/कार्यासन-६, दिनांक ०९ मे, २०१९.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता **अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी** संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ६५,८५,००,०००/- (रुपये पासष्ट कोटी पंचाऐंशी लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रक व आदिवासी विकास विभागाचे संदर्भ क्रमांक ४ येथील शासन निणर्यान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीच्या खर्चासाठी लेखानुदानाद्वारे मंजूर केलेली रक्कम रुपये २१,९५,००,०००/- (रुपये एकवीस कोटी पंचाण्णव लक्ष फक्त) वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयांना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक टी-५, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, ७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना, (०२) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनांतर्गत योजना (ओटीएसपी), (०२) (०३) संजय गांधी निराधार अनुदान योजना (कार्यक्रम), ५०-इतर खर्च, (२२३५ सी १६१) " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाचे परिपत्रक व संदर्भ क्र. ४ येथील आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार व आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीयुडी २०१९/प्र.क्र.६/कार्यासन-६, दिनांक ०९.०५.२०१९ अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०५१६१२१९५८८१२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Wagh

Digitally signed by Prashant Pundlik Wagh
DN: CN = Prashant Pundlik Wagh, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Social Justice and Special Assistance
Date: 2019.05.16 12:34:10 +05'30'

(प्रशान्त पुं. वाघ)
कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई,
८) आदिवासी विकास विभाग, कार्यासन -६, मंत्रालय, मुंबई.
९) सह सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती, विसयो.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.संगांयो-२०१९/प्र.क्र.४५/विसयो, दिनांक : १४ मे, २०१९ सोबतचे सहपत्र. .

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता अनुदानाचे वितरण

संजय गांधी निराधार अनुदान योजना (२२३५ सी १६१)

अनुसूचित जमाती लाभार्थी संख्या (रक्कम रुपयात)

अ.क्र.	जिल्हा	नियंत्रक अधिकारी क्रमांक	अनुसूचित जमाती लाभार्थी संख्या	एप्रिल, २०१९	मे, २०१९	जून, २०१९	जुलै, २०१९	या आदेशान्वये एकूण वितरीत रक्कम
१	२	३	४	५	६	७	८	९
१	मुंबई शहर	N0028	१५	६९९६	६९९६	६९९६	६९९६	२७९८४
२	मुंबईउपनगर	N0029	४३	२००५५	२००५५	२००५५	२००५५	८०२२०
३	ठाणे	N0036	१३८५	६४५९८३	६४५९८३	६४५९८३	६४५९८३	२५८३९३२
४	रायगड	N0012	२२०५	१०२८४४२	१०२८४४२	१०२८४४२	१०२८४४२	४११३७६८
५	रत्नागिरी	N0023	१७७	८२५५५	८२५५५	८२५५५	८२५५५	३३०२२०
६	सिंधुदूर्ग	N0018	६५	३०३१६	३०३१६	३०३१६	३०३१६	१२१२६४
७	पालघर	N0037	७५६७	३५२९३५४	३५२९३५४	३५२९३५४	३५२९३५४	१४११७४१६
	कोंकण विभाग		**११४५७**	**५३४३७०१**	**५३४३७०१**	**५३४३७०१**	**५३४३७०१**	**२१३७४८०४**
८	नाशिक	N0006	४३६३	२०३४९६४	२०३४९६४	२०३४९६४	२०३४९६४	८१३९८५६
९	धुळे	N0026	४७४४	२२१२६६७	२२१२६६७	२२१२६६७	२२१२६६७	८८५०६६८
१०	जळगाव	N0010	७८६३	३६६७४१२	३६६७४१२	३६६७४१२	३६६७४१२	१४६६९६४८
११	अहमदनगर	N0030	१५९९	७४५७९५	७४५७९५	७४५७९५	७४५७९५	२९८३१८०
१२	नंदुरबार	N0027	६६३०	३०९२३२४	३०९२३२४	३०९२३२४	३०९२३२४	१२३६९२९६
	नाशिक विभाग		**२५१९९**	**११७५३१६२**	**११७५३१६२**	**११७५३१६२**	**११७५३१६२**	**४७०१२६४८**
१३	पुणे	N0040	१७७९	८२९७५०	८२९७५०	८२९७५०	८२९७५०	३३१९०००
१४	सोलापूर	N0019	१३९०	६४८३१५	६४८३१५	६४८३१५	६४८३१५	२५९३२६०
१५	सातारा	N0032	६८	३१७१६	३१७१६	३१७१६	३१७१६	१२६८६४
१६	सांगली	N0008	११६	५४१०४	५४१०४	५४१०४	५४१०४	२१६४१६
१७	कोल्हापूर	N0039	१००	४६६४१	४६६४१	४६६४१	४६६४१	१८६५६४
	पुणे विभाग		**३,४५३**	**१६१०५२६**	**१६१०५२६**	**१६१०५२६**	**१६१०५२६**	**६४४२१०४**
१८	नागपूर	N0014	१२५५१	५८५३९६१	५८५३९६१	५८५३९६१	५८५४०३३	२३४१५९१६
१९	वर्धा	N0025	४४५४	२०७७४०७	२०७७४०७	२०७७४०७	२०७७४०७	८३०९६२८
२०	चंद्रपूर	N0021	७५०८	३५०१८३५	३५०१८३५	३५०१८३५	३५०१८३५	१४००७३४०
२१	भंडारा	N0033	४१७०	१९४४९४६	१९४४९४६	१९४४९४६	१९४४९४६	७७७९७८४
२२	गडचिरोली	N0013	७२७८	३३९४५६०	३३९४५६०	३३९४५६०	३३९४५६०	१३५७८२४०
२३	गोंदिया	N0024	२६६७	१२४३९२५	१२४३९२५	१२४३९२५	१२४३९२५	४९७५७००
	नागपूर विभाग		**३८,६२८**	**१८०१६६३४**	**१८०१६६३४**	**१८०१६६३४**	**१८०१६७०६**	**७२०६६६०८**
२४	अमरावती	N0011	५६६४	२६४१७६८	२६४१७६८	२६४१७६८	२६४१७६८	१०५६७०७२
२५	अकोला	N0041	२९४८	१३७४९८८	१३७४९८८	१३७४९८८	१३७४९८८	५४९९९५२
२६	यवतमाळ	N0007	७३३७	३४२२०७९	३४२२०७९	३४२२०७९	३४२२०७९	१३६८८३१६
२७	बुलढाणा	N0038	१३७५	६४१३१९	६४१३१९	६४१३१९	६४१३१९	२५६५२७६
२८	वाशिम	N0022	३४४९	१६०८६६१	१६०८६६१	१६०८६६१	१६०८६६१	६४३४६४४
	अमरावती विभाग		**२०७७३**	**९६८८८१५**	**९६८८८१५**	**९६८८८१५**	**९६८८८१५**	**३८७५५२६०**
२९	औरगाबाद	N0035	३५१७	१६४०३७७	१६४०३७७	१६४०३७७	१६४०३७७	६५६१५०८
३०	बीड	N0034	१८२९	८५३०७१	८५३०७१	८५३०७१	८५३०७१	३४१२२८४
३१	नांदेड	N0031	४४९५	२०९६५३०	२०९६५३०	२०९६५३०	२०९६५३०	८३८६१२०
३२	परभणी	N0016	९४०	४३८४२९	४३८४२९	४३८४२९	४३८४२९	१७५३७१६
३३	उस्मानाबाद	N0020	३६६५	१७०९४०७	१७०९४०७	१७०९४०७	१७०९४०७	६८३७६२८
३४	जालना	N0015	१३५२	६३०५९१	६३०५९१	६३०५९१	६३०५९१	२५२२३६४
३५	लातूर	N0009	३४५	१६०९१२	१६०९१२	१६०९१२	१६०९१२	६४३६४८
३६	हिंगोली	N0017	२०००	९३२८२७	९३२८२७	९३२८२७	९३२८२७	३७३१३०८
	औरंगाबाद विभाग		**१८१४३**	**८४६२१४४**	**८४६२१४४**	**८४६२१४४**	**८४६२१४४**	**३३८४८५७६**
	एकूण		**११७,६५३**	**५४८७४९८२**	**५४८७४९८२**	**५४८७४९८२**	**५४८७५०५४**	**२१९५०००००**